# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 13.12.2025** **वार- शनिवार**

---

**<u>बुकफेस्ट</u>**

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने आयोजित पुस्तक महोत्सवाचं उद्घाटन थोड्याच  वेळापुर्वी पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर करण्यात आलं. यावेळी केंद्रिय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू सुरेश गोसावी, राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे मिलिंद मराठे, संयोजक राजेश पांडे, यशस्वी संस्थेचे विश्वेश कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. हा महोत्सव येत्या 21 तारखेपर्यंत सुरु राहणार आहे.

**<u>वैद्यकीय</u>**

पुण्याच्या हडपसरमधील सह्याद्री रुग्णालयात रुग्णाच्या निधनानंतर झालेल्या हल्ल्याचा आणि तोडफोडीचा भारतीय वैद्यकीय संघटनेनं निषेध केला आहे. वैद्यकीय संस्थेमध्ये उपचार करताना सर्व आवश्यक काळजी, प्रोटोकॉल्स आणि उपाययोजना पाळल्या जातात. उपचारासंदर्भातील सर्व माहिती रुग्ण आणि नातेवाइकांना पारदर्शक आणि समजेल अशा पद्धतीने वेळोवेळी दिली जाते. गंभीर आणि अतिदक्षता विभागात दाखल असलेल्या रुग्णांची प्रकृती कोणत्याही क्षणी बिघडू शकते, हे वैद्यकीय वास्तव आहे. प्रत्येक डॉक्टर आणि आरोग्य कर्मचारी रुग्ण लवकरात लवकर बरा होण्यासाठी सतत, प्रामाणिक प्रयत्न करीत असतो, असं संघटनेच्या प्रसिद्धिपत्रकात म्हटलं आहे.

**<u>आरोग्य</u>**

जीवनशैलीशी निगडित आजार वाढत चालले असल्याचं निरीक्षण आसाममधील कर्करोग तज्ज्ञ, डॉक्टर रवी कन्नन आर यांनी नोंदविलं आहे. पुण्यातील पी. एम. शाह फाऊंडेशन आणि वर्धमान प्रतिष्ठान यांच्यातर्फे आयोजित 14 व्या आरोग्य चित्रपट महोत्सवाचं राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयात आज उद्घाटन करताना ते बोलत होते. यावेळी आरोग्य चित्रपट निवडण्यासाठी परीक्षक म्हणून काम केलेल्या अनुजा देवधर, नीता मेहता, डॉ. लीना बोरुडे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. ‘व्हेनम वॉरियर’ या लघुपटानं आरोग्य चित्रपट महोत्सवाची सुरुवात झाली.

**<u>कचरा</u>**

पिंपरी-चिंचवड शहर अधिक स्वच्छ, आकर्षक आणि नीटनेटकं दिसावं, यासाठी महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून राबवण्यात येत असलेली रात्रीची स्वच्छता मोहीम प्रभावी ठरत आहे. या उपक्रमांतर्गत दररोज साधारण 25 टन कचरा संकलित केला जात असून अनेक मुख्य रस्ते, व्यवसायिक भाग आणि महत्त्वाच्या

चौकांमध्ये मोठ्या प्रमाणात स्वच्छतेत सुधारणा दिसून येत आहे. नवीन उपकरणं, तैनात कर्मचारी आणि वेळेचं सुयोग्य नियोजन यामुळं ही मोहीम यशस्वी ठरत आहे.

**कामगार-संहिता**

औद्योगिक कंपन्यांच्या मनुष्यबळ व्यवस्थापन विभागानं कामगार कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी असं आवाहन विधीज्ञ आदित्य जोशी यांनी आज यशस्वी स्किल्स लिमिटेडच्या पुढाकारानं आयोजित 'नवीन कामगार कायदे समजून घेताना' या विषयावरील कार्यशाळेत बोलताना केलं. नवीन कामगार कायद्यांमधून उद्भवणाऱ्या कायदेशीर प्रश्नांची सोप्या भाषेत मांडणी कंपनीतील व्यवस्थापक आणि अधिकारी यांच्यासाठी आदित्य जोशी आणि विधीज्ञ वरुण  जोशी यांनी केली. नवीन कामगार कायद्यांमध्ये कामगार संघटनांना स्पष्ट अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. कंपनी व्यवस्थापनानं कामगारांच्या सेवा-अटी, वेतनवाढीचे करार इत्यादी विषयांवर चर्चा करताना कामगार संघटनांशी संवाद साधणं आणि चर्चेच्या माध्यमातून करार करणं हा या कायद्यांचा मूलभूत उद्देश असल्याचं या तज्ञांनी सांगितलं.

**सदनिका**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत उभारण्यात येणाऱ्या डुडूळगाव इथल्या 1 हजार 190 तसंच आर्थिक दुर्बल घटकांसाठी किवळे इथं उभारण्यात आलेल्या 755 सदनिकांची संगणकीय सोडत परवा 15 तारखेला सकाळी 10 वाजता पिंपळेगुरव इथल्या नटसम्राट निळू फुले रंगमंदिरात होणार आहे.

**करगिल**

सरहद संस्थेतर्फे लडाख फेस्टिव्हल आणि कारगिल गौरव राष्ट्रीय पुरस्कार वितरण सोहळा पुण्यातील पीवायसी हिंदू जिमखाना इथं उद्या सकाळी 10 वाजता आयोजित करण्यात आला आहे. लडाखचे नायब राज्यपाल कविंदर गुप्ता यांच्या हस्ते फेस्टिवलचं उद्‌घाटन आणि पुरस्कार वितरण होणार आहे अशी माहिती संस्थेचे विश्वस्त अनुज नहार आणि समन्वयक लेशपाल जवळगे यांनी दिली. राष्ट्रसेवा, सामाजिक बांधिलकी आणि सीमावर्ती भागांसाठी योगदान देणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांचा करगिल गौरव राष्ट्रीय पुरस्काराने दरवर्षी सन्मान केला जातो. यंदा कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँकेला ‘संस्थात्मक पुरस्कार’ तर एअर व्हाइस मार्शल (निवृत्त) नितीन वैद्य, हाजी अनायत अली, ज्येष्ठ पत्रकार राजीव साबडे, पर्यटन क्षेत्रातील उद्योजिका झेलम चौबळ, सामाजिक कार्यकर्ते राज देशमुख, आर्किटेक्ट दिलीप काळे यांना करगिल पुरस्कारान सन्मानित केलं जाणार आहे.

**पुरस्कार**

पुणे जिल्ह्याच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला आधुनिक रूप देण्यासाठी पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी  गजानन पाटील यांच्या संकल्पनेतून "पुणे मॉडेल प्राथमिक आरोग्य केंद्र" हा उपक्रम राबवण्यात येत आहे. या उपक्रमाला SKOCH ORDER OF MERIT 2025 या स्पर्धेत अंतिम फेरीत स्थान मिळालं आहे. देशभरातील विविध नावीन्यपूर्ण आणि लोकाभिमुख उपक्रमांची ही स्पर्धा आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**